# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त यांचे कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आस्था/ 2851 /2023-24 दि. 20/02/2024

**प्रत्यायोजन आदेश**

**विषय :- "उपायुक्त" पदाच्या पदभाराबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील "उपायुक्त" यांचेकडे सोपविलेल्या विविध विभागांचे पदभाराबाबत यापूर्वी पारित केलेले सर्व आदेश याद्वारे अधिक्रमित करून सदरचे नव्याने आदेश पारित करणेत येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ अन्वये खालील दर्शविलेल्या खात्यांची/ विभागांची प्रशासन आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणांत विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्य, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष खालील अतिरिक्त आयुक्त यांच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशान्वये सोपविण्यांत येत आहेत.

**अ) श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मुख्यालय)**

१. सामान्य प्रशासन/आस्थापना
२. निवडणुक व जनगणना
३. सुरक्षा
४. विधी
५. वाहन व यांत्रिकी
६. स्थानिक संस्था कर
७. क्लस्टर डेव्हलपमेंट
८. अभिलेख
९. घनकचरा व्यवस्थापन (SBM व शासन निधी संबंधित विषय, दैनंदिन साफसफाई, C & D व नालेसफाई)

**ब) श्री. संजय शिंदे, उपायुक्त**

१. मालमत्ता कर
२. सार्वजनिक आरोग्य
३. माहिती व तंत्रज्ञान विभाग
४. **अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन**
५. माहिती व जनसंपर्क
६. परवाना
७. पर्यावरण
८. शिक्षण
९. मिळकत

**क) श्री. रवि पवार, उपायुक्त**

१. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन व नियंत्रण
२. फेरीवाला धोरण
३. मध्यवर्ती भांडार
४. पशुवैद्यकीय
५. ई-टेंडरिंग, CCTC यंत्रणा
६. ग्रंथालय

**ड) श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त**

१. उद्यान
२. घनकचरा व्यवस्थापन (प्रकल्प)
३. समाज विकास (NULM सह)
४. महिला व बाल कल्याण
५. पे ॲण्ड पार्क, भुईभाडे
६. बाजार लिलाव
७. जाहिरात
८. क्रिडा आणि सांस्कृतिक कार्य

संबंधित उपायुक्तांनी वरील विभागांचे कामकाज वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकारांच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरण मंजूर करण्यापूर्वी मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांची सहमती घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पूर्व मान्यतेने व मंजूरीनेच पाठविणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका उपायुक्तांनी आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी ह्या सर्व प्रयोजनांसाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत; असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

(**संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
१. **श्री. मारुती गायकवाड,** उपायुक्त (मु.)
२. **श्री. संजय शिंदे,** उपायुक्त
३. **श्री. रवि पवार,** उपायुक्त
४. **श्रीम. कल्पिता पिंपळे,** उपायुक्त

प्रत :- माहितीस्तव.
१. अतिरिक्त आयुक्त (सर्व)
२. सर्व विभाग प्रमुख / खातेप्रमुख
३. आदेशनस्ती.